# सांगली अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि.,सांगली

## - वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस -

*(फक्त सभासदांसाठी)*

सांगली अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., सांगली या बँकेची **'८७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा'** मंगळवार, **दिनांक २९/०८/२०२३** रोजी दुपारी ठीक ३.०० वाजता **विष्णूदास भावे नाट्यमंदिर, हरभट रोड, सांगली - ४१६ ४१६** या ठिकाणी खालील कामकाजांकरिता होणार आहे. सदर सभेस आपण उपस्थित राहावे, ही विनंती.

### सभेपुढील विषय

१) दिनांक २२-०९-२०२२ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

२) मा. संचालक मंडळाने तयार केलेला दिनांक ३१ मार्च २०२३ अखेरचा ताळेबंद, नफा-तोटा पत्रक व सन २०२२-२०२३ चा संचालक मंडळाच्या कामकाजाचा अहवाल स्वीकृत करणे.

३) बँकेच्या सन २०२२-२०२३ या वर्षासाठी मा.वैधानिक लेखापरीक्षक यांच्याकडून आलेला दिनांक ३१-०३-२०२३ अखेरचा ऑडिट मेमोरेंडम स्वीकृत करणे व सन २०२१-२०२२ च्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालाच्या दोष-दुरुस्ती अहवालाची नोंद घेणे.

४) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ चे नियम ४९ अन्वये मा.वैधानिक लेखापरिक्षकानी बुडीत असल्याबद्दल प्रमाणित केलेली कर्ज खाती वसुलीचा हक्क अबाधित ठेवून निर्लेखीत करणे.

५) सन २०२२-२०२३ मध्ये सूट-सवलत व एकरक्कमी परतफेड योजने अंतर्गत व्याजामध्ये सवलत देऊन कर्ज खाती भागविली, त्याची नोंद घेणे.

६) सन २०२२-२०२३ या सालात बँकेचे संचालक व त्यांचे नातेवाईक यांनी घेतलेल्या कर्जाची माहिती घेणे.

७) बँकींग रेग्युलेशन ॲक्ट १९४९ मधील तरतुदीनुसार रिझर्व्ह बँकेचे परिपत्रकास अनुसरुन आर्थिक वर्ष सन २०२३-२०२४ या वर्षासाठी वैधानिक लेखापरिक्षक यांचे नेमणूकीबाबत केलेली कार्यवाही या संदर्भातील माहितीची नोंद घेणे.

८) सन २०२३-२०२४ चे अंदाज पत्रकाची नोंद घेणे.

९) बँकेच्या स्टाफींग पॅटर्नला मान्यता देणे.

१०) सदर वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असलेल्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापीत करणे.

११) सभासदांना प्रशिक्षण देणेबाबतचा पुढील वर्षीचा आराखडा तयार करणे.

१२) मा.अध्यक्ष यांच्या परवानगीने आयत्यावेळी येणा-या विषयांची चर्चा करणे.

**ठिकाण : सांगली.**

**दिनांक : १५/०७/२०२३**

*मा.संचालक मंडळाचे आदेशावरुन;*

**उल्हास विठ्ठल नायक**

**मुख्य कार्यकारी अधिकारी**

### -: सभासदांना सूचना :-

१) वार्षिक सर्वसाधारण सभेची वेळ जरी दुपारी ३.०० वा. असली तरी सर्व सभासदांनी दुपारी २.३० वाजता उपस्थित रहावे. दुपारी २.३० ते ३.०० या वेळेत सर्व सभासदांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

२) गणसंख्येअभावी सभा तहकूब झाल्यास सदर वार्षिक सभा त्याच दिवशी वरील ठिकाणी दुपारी ३.३० वाजता घेण्यात येईल व त्या सभेला गणसंख्या नसली तरी सभेचे कामकाज चालेल.

३) आपला पत्ता बदलला असल्यास नवीन पत्ता बँकेच्या प्रधान कार्यालयास त्वरित कळवावा.

४) भागधारक कंपन्या,फर्मस्, सोसायट्या इत्यादी संस्थांनी आपल्या संस्थेतर्फे वार्षिक सर्वसाधारण सभेत भाग घेऊन, प्रसंगी मतदान करण्याचा ठराव वा अधिकारपत्र बँकेकडे दि. १८/०८/२०२३ पूर्वी पाठविल्यास सोयीचे होईल.

५) म.स.का. कलम ३२ मधील तरतूदीनुसार वार्षिक सर्वसाधारण सभेच्या विषय सूचीवरील विषयासंबंधीची कागदपत्रे बँकेच्या प्रधान कार्यालयाकडे सभासदांना दिनांक २३/०८/२०२३ ते दिनांक २५/०८/२०२३ या कालावधीत सुट्टीच्या दिवसाखेरीज, कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत **मुख्य कार्यकारी अधिकारी** अगर त्यांचे जागी कामकाज पाहणारे अधिकारी यांच्याकडे पाहावयास मिळतील.

६) सभासदांच्या भाग वर्गाच्या अर्जाचा विचार दिनांक १४/०८/२०२३ ते दिनांक २९/०८/२०२३ अखेर या मुदतीत तहकूब ठेवण्यात येईल.

७) बँकेची website : www.sangliurbanbank.in वर बँकेचा ८७ वा वार्षिक अहवाल दि. २४/०८/२०२३ पासून प्रसिध्द करीत आहोत.

**टीप : सभासदांना वार्षिक अहवालाची प्रत नजीकच्या शाखा कार्यालयात दिनांक २४/०८/२०२३ पासून मिळण्याची व्यवस्था केलेली आहे.**